15-03-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 03/14/2025 9:59 PM Page 1



# रवींद्र भवन साखळीत रंगोत्सवाला मोठी गर्दी

## मुख्यमंत्री डॉ. सावंत यांचाही सहभाग

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी : रंगोत्सवात सहभागी लोकांबरोबर रंगपंचमी खेळताना मुख्यमंत्री.

**डिचोली, दि. १४ :** साखळी रवींद्र भवनतर्फे रवींद्र भवनच्या पार्किंग जागेत साखळीतील इतर क्लब व संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या होळीच्या दिवशी रंगोत्सव या उत्सवात समस्त साखळीवासीयांबरोबर मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत व महिला नेत्या सुलक्षणा सावंत यांनीही सहभाग घेतला. साखळीवासीयांबरोबर होळीच्या रंगात खेळताना एकमेकांना रंग लावत तसेच रंग हवेत उडवत मुख्यमंत्री व त्यांची पत्नीने रंगपंचमीचा आनंद लुटला.

समस्त गोमंतकियांना यावेळी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी होळीच्या शुभेच्छा व्यक्त करताना एकमेकांना रंग लावत असताना आपले डोळे, नाक व आरोग्याची काळजी घ्यावी, असा संदेश दिला.

साखळी रवींद्र भवनतर्फे यावर्षी अनेक वर्षांच्या खंडानंतर पुन्हा रंगपंचमीचा सोहळा आयोजित केला होता. या सोहळ्यात साखळीतील विविध समाजसेवी संस्था, क्रीडा क्लब व इतरांचाही सहभाग करून घेतला होता. सकाळी रवींद्र भवनच्या पार्किंग जागेत खास उभारण्यात आलेल्या रंगमंच व मंडपात रेनडान्स तसेच लहान मुलांसाठी भव्य असा मोठ्या आकाराचा कृत्रिम स्विमिंग पूल तयार करण्यात आला होता. यामध्ये लहान मुलांनी धमाल मजा केली. तसेच रेनडान्स मध्ये आकर्षक संगीतावर तरुणांचा नृत्य आविष्कार पाहायला मिळाला.

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत व सुलक्षणा सावंत यांनी या रंगोत्सवात उपस्थिती लावताच सर्वांनी त्यांना रंग लावला. त्याचप्रमाणे मुख्यमंत्र्यांनीही स्वतः सर्वांना रंग लावत शुभेच्छा व्यक्त केल्या. यावेळी बोलताना मुख्यमंत्र्यांनी होळी हा रंगाचा सण असून आपल्या आयुष्यात सकारात्मक रंगांची उधळण या सणापासून सुरू होत असते. या सणाला सदैव महत्त्व देत सकारात्मकपणे पुढे जात असताना आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी. तसेच आपण लावत असलेल्या रंगातून इतरांना परिणाम होऊ नये, याचीही काळजी घ्यावी, असे आवाहन केले.

यावेळी मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी स्विमिंग पूलमध्ये मौजमजा करत असलेल्या लहान मुलांबरोबर स्वतः ही मजा लुटली. तसेच या रंगोत्सवात स्थानिक लहान मोठ्या व्यावसायिकांनी विविध प्रकल्पाची दालने थाटली होती. या सर्व दालनांना मुख्यमंत्र्यांनी भेट देऊन माहिती करून घेतली. रवींद्र भवन साखळीतर्फे गेल्या काही महिन्यांमध्ये लोकांचे मनोरंजन तसेच ज्ञानात भर पडणारे अनेक कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. होळी व त्याला लागून होणारी रंगपंचमी हा तसा मोठा उत्सव असून या उत्सवाची मजा गटा-गटाने लुटण्यापेक्षा सर्व साखळीवासीयांनी एकत्रित येऊन भव्य अशा जागेत ही मजा एकत्रितपणे लुटावी व एकमेकांमधील संबंध अधिक दृढ व्हावे, हा या कार्यक्रमा मागचा हेतू होता. तो या कार्यक्रमाला लाभलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे सफल झाल्याचे रवींद्र भवनचे उपाध्यक्ष दत्ताराम चिमुलकर यांनी म्हटले.

# शिरगाव शाळेत बाजार डे मोठ्या उत्साहात

टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १४ :** शिरगाव येथील सरकारी प्राथमिक विद्यालययात सर्व विद्यार्थांसाठी बाजार डे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शिरगाव गावची सरपंच वेदिक शिरगावकर यांना आमंत्रित करण्यात आले. सरपंच वेदिका शिरगावकर ह्यांच्या हस्ते उद्घाटन सोहळा पार पडला. उद्घाटन सोहळ्यात शाळेची मुखाध्यापिका . शिवानी तेली, पालक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष राजेश गावकर आणि शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गुरूदास घाडी, पालक व इतर शिक्षिका उपस्थित होते. विद्यार्थ्यांना दैनंदित जीवनात लागणाऱ्या विविध वस्तू, फळे, भाज्या यांची ओळख व पैशांचा व्यवहार व व्यवहारीक न्याय ह्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा व खरेदी- विक्रीचा अनुभव मिळावा या हेतूने शाळेतील शिक्षकांनी हा उपक्रम आयोजित केला. पालकांनी विविध वस्तू मुलांना विकण्यासाठी उपलब्ध करून दिल्या व या कार्यक्रमात मोठा सहभाग दाखवला. सगळ्यांचा मदतीने शाळेतील बाजार डे मोठ्या उत्साहात पार पडला.

# शिवोलीत कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर

■ टीम दैनिक हेराल्ड

**शिवोली, दि. १४ :** शिवोली मोफत कायदेशीर मदत कक्षातर्फे कायदेशीर व्यवस्था सुलभ करणे या विषयावर मारणा पंचायत सभागृहात प्रमुख कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश नागरिकांना त्यांच्या मूलभूत हक्कांची जाणीव करून देणे आणि गुंतागुंतीच्या कायदेशीर संकल्पना सुलभ करणे हा होता.

कार्यक्रमाला शिवोलीच्या आमदार डिलायला लोबो प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तर शिवोली पंचायतीचे पंच सदस्य अमित मोराजकर यांनी सन्माननीय अतिथी म्हणून हजेरी लावली. कार्यक्रमाची सुरुवात सेल प्रभारी मिस जेन डी सूझा यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. त्यानंतर दीपप्रज्वलन व मान्यवरांची ओळख करून देण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते ॲड. ईशान उसपकर हे एक नामांकित वकील, प्रशिक्षक आणि अनेक पुरस्कार विजेते होते. त्यांनी भारतीय संविधान हा लोकशाहीचा पाया कसा आहे, यावर भर देत कायद्याद्वारे स्वातंत्र्य आणि निर्बंध यामधील संतुलन कसे साधले जाते, याची सखोल माहिती दिली. त्यांनी समान लोकांसाठी समान कायदे आणि असमान लोकांसाठी असमान कायदे या संकल्पनेवर प्रकाश टाकत नवीन फौजदारी कायदे आणि त्यांची प्रभावीता यावर सविस्तर मार्गदर्शन केले.

सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर ॲड. उसपकर यांनी पासवर्ड नियमितपणे अपडेट करण्याचे महत्त्व स्पष्ट केले तसेच सायबर क्राइम हेल्पलाइन क्रमांक शेअर केला. गोव्यात लागू असलेल्या समान नागरी संहिता आणि मालमत्तेच्या एकत्रीकरणासंदर्भातील विशेष तरतुदींवर त्यांनी विस्तृत माहिती दिली. ग्राहक हक्कांवर भाष्य करताना, त्यांनी ई-दाखिल या ऑनलाइन ग्राहक तक्रार पोर्टलचा उपयोग कसा करावा, याचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अखेरीस प्रश्नोत्तर सत्रात उपस्थितांनी विविध कायदेशीर मुद्द्यांवर प्रश्न विचारले, ज्याला ॲड. उसपकर यांनी सविस्तर उत्तरे दिली. या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रेक्षकांना मौल्यवान कायदेशीर माहिती मिळाल्याने त्यांच्या हक्कांची सखोल समज निर्माण झाली. आयोजकांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले.

बांदा : येथील होलिका पूजन कार्यक्रम.

# बांदा येथे होळी पौर्णिमा उत्साहात साजरी

■ टीम दैनिक हेराल्ड

**बांदा, दि. १४ :** येथे गुरुवारी रात्री पारंपरिक होळी पौर्णिमेचा सण उत्साहात साजरा झाला. श्री बांदेश्वर मंदिर नजीकच्या होळीचा खुंट या जागेवर होळी उभी केल्यानंतर धार्मिक विधीनंतर ग्रामस्थांनी परंपरेप्रमाणे आपले वार्षिक नारळ तसेच नवसाची तोरणे आदी अर्पण केले. श्री बांदेश्वर भूमिका पंचायतनातील सर्व मंदिरांच्या समोर होलिका पूजन विधी झाल्यानंतर होळीचा खुंट येथील मुख्य होळीचे पूजन करण्यात आले. त्यानंतर गाऱ्हाणे घालण्यात आले. यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. परंपरेप्रमाणे होळीपासून शिमगोत्सव आरंभ झाला असून पंधरा दिवसांनी गुरुवारी दि. २७ मार्च रोजी बांद्याची रंगपंचमी होणार आहे.

# नियमित योग प्राणायामामुळे मन, बुद्धीची वाढ

▶ बाळकृष्ण नाईक : साखळीत योग शिबिराचे उद्घाटन

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. १४ :** पतंजली योग समिती आयोजित ५ दिवशीय योग शिबिराची सुरुवात रवींद्र भवन साखळीत सुरू झाली. शिबिराच्या उद्घाटन समारंभाला प्रमुख पाहुणे आणि मार्गदर्शक म्हणून डिचोली पतंजली योग समितीचे प्रभाग प्रभारी बाळकृष्ण नाईक, रवींद्र भवनचे उपाध्यक्ष विशांत चिमुलकर, कार्याध्यक्ष मनोहर गावस, साखळी पतंजली योग समितीचे प्रभारी संतोष भजे व ज्येष्ठ योग शिक्षक शांताराम काणेकर उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलाने झाली. संतोष भजे यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले. प्रमुख पाहुणे बाळकृष्ण नाईक यांनी आपल्या भाषणात योग प्राणायामाचे महत्त्व पटवून देताना सांगितले की, पृथ्वी ही स्वतः भोवती व सूर्याभोवती फिरत असते. स्वतः भोवती फिरताना आपल्याला दिवस व रात्र याची प्रचिती येते तर सूर्याभोवती फिरताना आपल्याला ऋतुमान बदल जाणवते. हे पृथ्वीचे फिरणे खूप महत्त्वाचे असते. आपण सुद्धा सुदृढ रहाण्याकरीता सतत शरीराला गती दिली पाहिजे.

याप्रसंगी रवींद्र भवनचे उपाध्यक्ष विशांत चिमुलकर यांनी आपले विचार व्यक्त करताना योग शिबिर आयोजन केल्याबद्दल साखळी पतंजली प्रभाग समितीची स्तुती केली व शुभेच्छा दिल्या. यावेळी साधक व शिबिरार्थीकडून विविध योगासन व प्राणायामचा सराव करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिद्धी गुणाजी यांनी केले तर कार्याध्यक्ष मनोहर गावस यांनी आभार व्यक्त केले. जवळ जवळ दीडशे शिबिरार्थी योग शिबिराला उपस्थित होते.

# आंतरराष्ट्रीय मानवी तस्करी प्रकरणात केनियन महिला अटकेत

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १४ :** गोवा पोलिसांच्या गुन्हे शाखेने आंतरराष्ट्रीय मानवी तस्करी रॅकेट चालवल्याच्या आरोपाखाली केनियाची नागरिक नॅन्सी किंगोरी उर्फ आलियान हिला अटक केली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, केनियाचीच नागरिक असलेल्या पीडितेने ३ मार्च रोजी तक्रार दाखल केल्यानंतर हे प्रकरण उघडकीस आले. आरोपीने १८ नोव्हेंबर २०२४ पासून पीडितेला वेश्याव्यवसायात ढकलल्याचा आरोप आहे.

पोलिस सूत्रांनी सांगितले की, आलियानने गोव्यातील हॉस्पिटॅलिटी उद्योगात नोकरी देण्याचे आमिष दाखवून केनियातील तरुणींना गोव्यात आणले. त्यानंतर त्यांचे पासपोर्ट जप्त करून जबरदस्तीने देह व्यापारात ढकलले जात होते. आलियान पीडित मुलींचे फोटो मसाज रिपब्लिक' या वेबसाइटवर अपलोड करत असे आणि ऑनलाइन ग्राहक शोधण्यासाठी स्वतःचा संपर्क क्रमांक जोडत असे, असे एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. पोलिसांच्या मते, बहुतांश ग्राहक अरब, आफ्रिकन आणि भारतीय पुरुष होते. प्रत्येक सौद्याकरिता आरोपीने १० हजार ते ३० हजार रुपये घेतल्याचे उघड झाले आहे. पीडित मुलींना उत्तर गोव्याच्या किनारपट्टीवर ठेवलं जात असे आणि त्यांची ने-आण गोवा, मुंबई आणि बंगळुरू दरम्यान केली जात होती. पीडितेने केनियातील एका स्वयंसेवी संस्थेशी संपर्क साधल्यानंतर हे प्रकरण उघडकीस आले. संस्थेने पीडितेला वाचवण्यासाठी एआरझेडला (अर्ज) या संस्थेला मदतीची विनंती केली. गुन्हे शाखेने यास तत्काळ प्रतिसाद देत तपास सुरू केला. एसपी राहुल गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने बंगळुरूमध्ये छापा टाकून पीडितेची सुटका केली आणि आरोपीला अटक केली. एलपीएसआय प्रगती मलिक आणि गुन्हे शाखेच्या पथकाने आलियानला अटक करून १३ मार्च रोजी रायबंदर येथील गुन्हे शाखा कार्यालयात आणले. आरोपीला म्हापसा येथील न्यायिक दंडाधिकारी प्रथम श्रेणी (जेएमएफसी) यांच्यासमोर हजर करण्यात आले, ज्यानंतर तिला सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

# पार्सेकर महाविद्यालयात करिअर गायडन्सवर व्याख्यान

■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल : पार्सेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालयात करीयर विषयक मार्गदर्शन कार्यक्रमात प्राचार्य डॉ पांडुरंग पंडित. सोबत मार्गदर्शक लेफ्टनंट डॉ. संदेश नाईक, प्रमोद केरकर व इतर.

**हरमल, दि. १४ :** गणपत पार्सेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालयात, पालक शिक्षक समिती मार्फत विद्यार्थ्यांसाठी करिअर गायडन्स विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

संस्थेच्या ज्ञानदा सभागृहात आयोजित कार्यक्रमास प्रभारी प्राचार्य डॉ. पांडुरंग पंडित, पालक शिक्षक समितीचे समन्वयक प्रमोद केरकर आणि व्याख्याते लेफ्टनंट डॉ. संदेश नाईक मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रथम सत्रामध्ये प्रमोद केरकर यांनी पी. टी.ए.च्या नवनवीन उपक्रमांविषयी माहिती देत प्रास्ताविक केले. महाविद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्कासाठी पालक शिक्षक समितीमार्फत अर्थसहाय्य करण्यात आले. त्याबाबतचे धनादेश मान्यवरांच्या हस्ते त्यांना सुपूर्द करण्यात आले. हा नवा स्तुत्य उपक्रम महाविद्यालयात राबवण्यात आला याबद्दल पालक शिक्षक समितीचे, प्राचार्य डॉ. पंडित यानी विशेष कौतुक केले.

दुसऱ्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना लेफ्टनंट डॉ. संदेश नाईक यांनी भविष्यातील नोकरीच्या विविध संधीविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी आपला सक्रिय सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.निकीता शिरोडकर यांनी केले. पाहुण्यांची ओळख अंकिता नाईक यांनी करून दिली, तर प्रा. वैभवी चोडणकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाला समिती सदस्य प्रा. सागर डवरी, डॉ. राजीव पंचम, दिक्षा वायंगणकर , ग्रंथालय समिती सदस्या शालिनी नाईक आणि इतर सदस्य उपास्थित होते.

वजरी : भाऊसाहेब बांदोडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करताना ज्येष्ठ शिक्षक विकास आजगावकर व इतर.

# भाऊसाहेब बांदोडकर बहुजन समाजाचे आधारस्तंभ

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ विकास आजगावकर : वजरी माध्यमिक विद्यालयात भाऊसाहेब बांदोडकर जयंती

**पेडणे, दि. १४ :** भाऊसाहेब बांदोडकर हे बहुजन समाजाचे आधारस्तंभ होते. ते दुरद्दष्टीचे नेते तसेच गोव्याच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक कला व क्रीडा क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय व भरीव योगदान दिले, असे विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक विकास आजगावकर यांनी केले.

वजरी शासकीय माध्यमिक विद्यालयात भाऊ साहेब बांदोडकर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी ते बोलत होते.

सुरूवातीस विद्यालयाचे विकास आजगावकर यांच्या हस्ते भाऊसाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. विद्यार्थिनी श्रावणी परबकर हिने भाऊसाहेब बांदोडकराच्या बालपणाबद्दल माहिती कथन केली. मुग्धा शेट्ये हिने भाऊसाहेबांच्या जीवनावर आधारित कविता सादर केली. सूत्रसंचालन शिक्षिका निष्ठा कोळंबकर यांनी केले.

**Village Panchayat Se Old Goa, Tiswadi-Goa**

VP/SOG/TIS//2024-2025/ 2062 **TENDER NOTICE** Date: 13.03.2025

The Sarpanch on behalf of the V.P. Se Old Goa, Tiswadi-Goa, invites sealed percentage rate tender from eligible Contractors of state PWD Goa, registered in appropriate class and categories for the following work.

| Sr. No. | Name of work & location | Estimated cost put to tender | Earnest money deposit | Cost of tender Document | Class and category of Contractor | Period of completion (in days) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | Re-construction of existing drainage from Dongrikar house to main road in ward No.04 in the jurisdiction of V.P. Se Old Goa. | Rs.4,83,102.10 | Rs.9662 /- | Rs.2000/- | Class III (Old)/ Class V (New) & above (RBLD | 60 days (excluding monsoons) |
| 2 | Reconstruction of existing compound wall of Panchayat office along with pavers around Panchayat office ward No.04 in the jurisdiction of V.P. Se Old Goa. | Rs.4,65,503.71 | RS.9310/- | Rs.2000/- | Class III (Old)/ Class V (New) & above (RBLD | 60 days (excluding monsoons) |

**Terms and conditions:** **1.** Last date of receiving application is on **26/03/2025 up to 12.00 noon** along with cost of tender form (non-refundable). **2.** Date of issue of blank tender form is on **28/03/2025 up to 12.00 noon. 3.** Date of receipt of sealed tender is on **01/04/2025 up to 11.30 a.m.** and will be opened on same day at **12.00 noon. 4.** Application for issue of tender form shall be accompanied with **a)** Attested copy of valid registration certificate of the contractor in the concerned class and category of work. **b)** Attested copy of PAN card. **c)** Attested copy of valid GST registration certificate and acknowledgement of up-to-date return filed with ARN. (Application Reference Number generated on GST common portal) as per GST law. **d)** Declaration of the works in hand shall be submitted with detailed list indicating the present status, on Rs.100/- stamp paper (however tender form will not be issued to the person who has works in hand more than four times the tendering limit). **e)** Attested copy of valid Income Tax clearance Certificate. **5.** EMD shall be in the form of Demand Draft/Deposit Call Receipt (DCR)/Pay Order from Nationalized or Scheduled bank drawn in favor of Village Panchayat Se Old Goa payable at Se Old Goa sealed in separate envelop. **6.** Contractor shall submit separate application for each work. Incomplete and third-party application shall not be entertained by this Panchayat and no tender form shall be issued. **7.** Unsealed and conditional tenders will be rejected outright. **8.** The contractor shall quote the tender excluding GST as applicable shall be paid separately on total value of work executed. **9.** For the tenders/Items of tender in case of being quoted abnormally below i.e. 20.00% below the estimated cost, than the contractor shall furnish on demand an additional performance security in the form of Bank guarantee from National/Scheduled Bank for that amount which is worked out as difference between quoted amount and reasonable Amount reduced by 20.00%. **10.** Right to accept or reject any or all the tenders without assigning any reasons is reserved with the Village Panchayat. The Panchayat reserves the right to reject any of tenders and accept any one without assigning any reason thereof.

Seal Sd/- ( Medha M. Parvatkar ) Sarpanch, V. P. Se Old Goa, Tiswadi-Goa

# भाऊसाहेबांच्या कार्याला पुढे नेण्याची गरज

## प्राध्यापक अरुण नाईक मांद्रेत भाऊसाहेब बांदोडकर यांची जयंती साजरी

■ टीम दैनिक हेराल्ड

मांद्रे : स्व. भाऊसाहेब बांदोडकर यांच्या जयंती कार्यक्रमात बोलताना अपर्णा शेट्ये. बाजूला प्रा.अरुण नाईक, श्रीधर मांजरेकर.

**पेडणे, दि. १४ :** देशात छत्रपती शिवाजी महाराज आणि संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मान सन्मान दिला जातो. त्याच पद्धतीने गोव्यात भाऊसाहेब बांदोडकर यांना मान सन्मान दिला जात आहे. भाऊंचे कार्य अजरामर कार्य म्हणून आजही इतिहासामध्ये नोंद झालेली आहे. आज कुणालाही शक्य नाही, भाऊसाहेब बांदोडकरसारखे मुख्यमंत्री पुन्हा तयार होणे खूप कठीण असल्याचे प्रतिपादन श्री सप्तेशवर उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक अरुण नाईक यांनी केले.

भाऊसाहेब बांदोडकर यांच्या जयंती निमित्ताने मांद्रे येथील बांदोडकर उद्यानात भाऊसाहेब बांदोडकर यांची मांद्रे विकास परिषद मार्फत जयंती साजरी केली. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी मांद्रे माजी जिल्हा पंचायत सदस्य श्रीधर मांजरेकर, अपर्णा शेट्ये व इतर मान्यवर उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक नम्रता देसाई यांनी केले.

विद्यार्थिनी वर्धा मांद्रेकर हिने भाऊसाहेब बांदोडकर याविषयी आपले विचार मांडून भाऊसाहेबांनी अल्पकाळात गोव्यासाठी केलेल्या कार्याची माहिती आपल्या भाषणातून दिली.

प्रा. नाईक म्हणाले की, भाऊसाहेब बांदोडकर यांनी जे राज्यासाठी कार्य केले आहे, त्या कार्याची पोचपावती बहुजन समाज वेळोवेळी देत असतो. शिक्षण क्षेत्रात क्रीडा या क्षेत्रातही त्यांनी भरारी घेतल्याचे दिसून आले. भाऊसाहेब बांदोडकर यांनी प्रत्येक गावामध्ये शिक्षण भरारी घेत असताना शैक्षणिक संस्था सुरू केल्या. शाळा उघडल्या. आरोग्य सेवेसाठी हॉस्पिटलची निर्मिती केली. कला भवनसाठी कला अकादमीची स्थापना झाली. सर्व क्षेत्रात भाऊंनी भरारी घेतली होती. भाऊंनी केवळ राज्याच्या विकासासाठी कार्य केले.

सुरुवातीला विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले. भाऊसाहेब बांदोडकर यांच्या पुतळ्याला प्राध्यापक अरुण नाईक, माजी जिल्हा पंचायत सदस्य श्रीधर मांजरीकर, शिक्षिका अपर्णा शेट्ये आदींनी आदरांजली वाहिली.